अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

मंगळवार, दि. ३० ऑगस्ट २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३३१ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## चुकीचे काहीच नाही : प्रवीण दरेकर



पाटील हे एक चांगले उद्योजक असून ते चांगले काम करत आहेत. त्यांनी काही चुकीचे केले असेल असे मला वाटत नाही, अशा शब्दात भाजपाचे नेते आ.प्रवीण दरेकर यांनी पाटील यांची बाजू घेत आयकर विभागाने केलेल्या त्यांच्या चौकशीवर प्रतिक्रिया दिली. ते पंढरपूरला आले असता पाटील यांच्या कार्यालयात आले होते. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील, भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर, डॉ बी पी रोंगे यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. याबाबत पत्रकारांशी बोलताना दरेकर म्हणाले, एखादा मराठी उद्योजक पुढे येत असेल तर त्याची उमेद वाढविली पाहिजे. आयकरच्या चौकशीत काय झाले आहे याची मला माहिती नाही. परंतु यामुळे एखाद्याला नाउमेद करून बाजूला टाकणे योग्य नाही. मला वाटत नाही यात काही असेल. ती एखाद्यावेळेस चौकशी किंवा कोणाची तरी तक्रार असू शकेल. याबाबतची योग्य ती उत्तर ते देतील.पाटील हे चांगले व्यावसायिक आहेत तसेच माझे मित्र ही आहेत. मी आणि मुंबै बँक सतत त्यांच्या पाठीशी राहिलो आहोत.दरम्यान पाटील हे भापजामध्ये प्रवेश करणार का? यावर बोलताना दरेकर म्हणाले, भाजपात सगळेच येतच आहेत. यामुळे पाटील हे ही एक ना एक दिवस भाजपात येतील. मी त्यांच्या पाठीशी कायम असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

# पाटलांनी अखेर अस्त्र उपसले, विठ्ठल परिवाराला ठणकावले



## तुमचीही घरे काचेची आहेत; आता मी दोन्ही हाताने दगड मारेन

✔ सुराज्य/पंढरपूर

**ऊस उत्पादकांचा मोठा विश्वास प्राप्त करून सोलापूरसह इतर जिल्ह्यांमधील साखर कारखान्यांवर हुकूमत प्राप्त केलेले पंढरपूरचे उद्योगपती अभिजित पाटील यांनी सोमवारी पंढरीत आल्या आल्या सत्याचे अस्त्र उपसले. आपल्या घरावर व संस्थांवर पडलेल्या धाडी या राजकीय द्वेषापोटी पडल्या असून विठ्ठल सहकारी साखर कारखाना सुरु होऊ नये अशी इच्छा असणाऱ्यांनी आपल्यावर हे कारस्थान रचले. त्यांचीही घरे काचेची आहेत. त्यांनी एक दगड मारला आता आमचे दोन्ही हात मोकळे असतील, आम्ही आता दोन्ही हातांनी दगड मारु असा खणखणीत इशारा पाटील यांनी दिल्यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ माजली आहे. विठ्ठल परिवारावर पाटील यांनी थेट हल्ला चढवल्याने सहकार क्षेत्रात नवा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता दिसते.**



सत्याला मरण नसते,असे म्हणतात,त्यानुसार पाटील यांनी सारे सत्य लोकांपुढे मांडले. माझ्यावर धाडी टाकायला लावणाऱ्यांचीही घरे काचेचीच आहेत. मी आता दोन्ही हातांनी दगड मारेन. आयकर विभागाच्या छाप्यात काहीच गैर आढळले नाही. चार दिवसांच्या आयकर विभागाच्या धाडीनंतर पाटील यांनी सोमवारी पंढरपुरात प्रसार माध्यमांशी पहिल्यांदा दिलखुलासपणे संवाद साधला. या चौकशीतून काहीच साध्य झाले नसल्याचा खुलासाही त्यांनी केला.

गेल्याच महिन्यात गुरसाळे येथील विठ्ठल साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक झाली होती.त्यात अभिजित पाटील यांच्या पॅनेलने विठ्ठल परिवाराचे प्रमुख भगिरथ भालके यांच्या पॅनलेचा धुव्वा उडवत विठ्ठलची सत्ता प्राप्त केली.विठ्ठलच्या अध्यक्षपदी पाटील यांचीच बिनविरोध निवड झाली.पाटील यांनी ज्या ज्या कारखान्यांमध्ये पाऊल टाकले, ते सर्व कारखाने सुस्थितीत चालत आहे.धाराशिवसारख्या कारखान्यात त्यांनी मोठी मेहनत घेऊन ऑक्सिजनचा प्रकल्प उभा केला.त्यांच्या या कामाची सर्वस्तरातून प्रशंसा झाली होती. कारण उस्मानाबादसह सोलापूर जिल्ह्यात ऑक्सिजनचा कोरोना काळात तुटवडा निर्माण झाला होता.

पाटील यांची सहकारी संस्थांमध्ये काम करण्याची प्रचंड इच्छाशक्ती आहे.आयकर खात्याच्या धाडी पडल्यानंतर सहकार क्षेत्रात थोडा संभ्रम निर्माण झाला होता.यामागे राजकिय षडयंत्र असण्याची शक्यताही जाणकरांनी व्यक्त केलेली होती. अखेर पाटील यांनीच सत्याचे कथन केल्याने हा संभ्रम दूर झाला.

### भुवया उंचावल्या

गेले चार दिवस पाटील यांचे पंढरपूरचे कार्यालय, घर आणि त्यांच्या ताब्यात असणाऱ्या उस्मानाबाद, लोहा-नांदेड, चांदवड-नाशिक, सांगोला इथल्या चार कारखान्यांवर एकाच दिवशी आयकर विभागाने धाडी टाकल्या होत्या. याशिवाय त्यांचे संचालक असणाऱ्या एकावर कोल्हापूर जिल्हातील अर्जुनवाड इथेही या धाडी पडल्या. त्यांना काल रविवारी रात्री उस्मानाबाद जिल्ह्यातील चोराखली इथल्या कारखान्यावर नेण्यात आले होते. पाटील सोमवारी सकाळी पंढरपूरमध्ये आले आणि आल्या आल्या विधानपरिषदेमधील भाजप नेते प्रवीण दरेकर यांच्यासोबत तिरंगा यात्रेत सहभागी झाल्याने सगळ्यांच्या भुवया उंचावल्या. दरेकर अध्यक्ष असणाऱ्या मुंबई डीसीसी बँकेने अभिजित पाटील यांच्या कारखान्यास ७० कोटीचे शॉर्ट लोन घेतले असल्याने त्यांच्या भेटीकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. दरेकर यांनी पाटील यांच्या आयकर खात्याने धाडी टाकलेल्या कार्यालयात येऊन चहापानाचा आस्वाद घेतला.

### 'हा' हेलपाटा मोठा करून गेला...

पंढरपूर आयकर खात्याची कारवाई हा तपासाचा भाग असल्याचे पाटील यांनी सांगितले पण, ही कारवाईला राजकीय द्वेषातून झाल्याचे दिसून येते. विरोधकांनी सोशल मीडियावर कॉमेंट्स केल्यामुळे त्याला राजकीय रंग असल्याचे स्पष्ट झाले होते. विठ्ठल सहकारी साखर कारखाना सुरू होऊ नये म्हणून माझ्या विरोधकांनी आयकर विभागाकडे तक्रारी केल्या. मात्र त्यामध्ये काही सापडले नाही, मला रोखण्याच्या विरोधकांचा डाव मी हाणून पाडला, असे पाटील यांनी दैनिक सुराज्यशी बोलताना सांगितले. सलग चार दिवस सुरू असलेल्या चौकशीमुळे पाटील यांच्या विषयी पंढरपूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सहानभूती निर्माण झाली आहे. अनेकांनी आपले देव पाण्यात ठेवून पाटील यांच्यामागे लागलेल्या चौकशीतून आबा लवकर बाहेर पडावेत, अशी प्रार्थना अनेकांनी केली. एकंदरीत आयकरच्या करवाईमध्ये काहीही निष्पन्न न झाल्यामुळे पाटील यांची प्रतिमा आणखी मोठी झाली.

### जप्त केलेली रोकड परत केली

आमच्या सर्व कारखाने आणि इतर व्यवसायात खात्याला १ कोटी १२ लाखांची रोकड सापडली होती. मात्र ही सर्व रोकड रेकॉर्डवर असल्याने त्यांनी ती जप्त केलेली रक्कम देखील आम्हाला परत दिली. महिलांच्या स्त्री धनात असलेले ५० ते ६० तोळे सोनेही आयकर विभागाने हिशोब बघून परत दिले. व्यवहारात ज्या काही त्रुटी आढळल्या आहेत, त्याची कागदपत्रे येत्या पंधरा दिवसात देण्याच्या सूचना आयकर विभागाने दिल्या. या चार दिवसात पाटील त्यांचे बंधू अमर पाटील, कारखान्याचे संचालक, सभासद आणि कर्मचारी अशा १०० लोकांची चौकशी आयकर विभागाने केली, अशी सारी माहिती त्यांनी सांगितली.

## मुळेगावजवळ दुचाकीचा अपघात; जावई ठार तर सासरे जखमी

✔ **सोलापूर** : दुचाकीला पाठीमागून दुसरी दुचाकी धडकल्याने पहिल्या दुचाकी वरील जावई ठार तर सासरे जखमी झाले. हा अपघात हैद्राबाद महामार्गावरील मुळेगाव पेट्रोल पंपाजवळ सोमवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास घडला.

किशोर वसंत खडके (वय ४९ रा.मित्रनगर शेळगी) असे मयताचे नाव आहे.तर लिंबण्णा शरणप्पा हलसगी(वय ७० रा.बोरामणी ता.दक्षिण सोलापूर) हे जखमी झाले.किशोर खडके हे आज दुपारच्या सुमारास आपले सासरे लिंबण्णा हलसगी यांच्या सोबत बोरामणी येथे निघाले होते. मुळेगाव येथील पेट्रोल पंपाजवळ पाठीमागून वेगाने आलेल्या दुचाकीच्या धडकल्याने दोघेही गंभीर जखमी झाले होते. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी किशोर खडके हे उपचारापूर्वीच मयत झाले. मयत खडके हे मार्केट यार्डात चहा विक्री तयारी करतात. त्यांच्या पश्चात पत्नी असा परिवार आहे.

## राणी लक्ष्मीबाई मंडईतील ४७ ओट्यांचा झाला लिलाव

■ एकूण ४६ हजार ५६८ रुपये भरणा



✔ **सोलापूर** : महापालिकेच्या वतीने राणी लक्ष्मीबाई मंडई येथील १९२ ओट्यांची लिलाव प्रक्रिया सोमवारी दुपारी पार पडली. त्यामध्ये ४७ ओट्यांना प्रतिसाद मिळाला. महापालिकेकडे या ओट्यांसाठी एकूण एकूण ४६ हजार ५६८ रुपये भरणा झाला.

महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मंडई विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी ही लिलाव प्रक्रिया पार पाडली. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या राणी लक्ष्मीबाई मंडई येथील नवीन एकूण १९२ ओट्यांचा लिलाव सोमवारी दुपारी करण्यात आला. या लिलावात ४७ ओटे घेण्यास विक्रेत्यांनी प्रतिसाद दिला. १९२ पैकी १४५ ओटे शिल्लक आहेत. राहिलेल्या १४५ ओट्याचा उद्या मंगळवारी दिनांक ३० ऑगस्ट २०२२ रोजी लिलाव करण्यात येणार आहे, अशी माहिती मंडई विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

या लिलाव प्रक्रियेत २२ जणांनी सहभाग नोंदविला होता. सहभाग नोंदविण्यासाठी शंभर रुपये प्रत्येकी प्रवेश फी होती. एका ओट्यास दरमहा चारशे रुपये भाडे आहे. नियमानुसार एका व्यक्तीने चार ओटे घेतले. एकूण ४७ ओटे लिलावात गेल्याने एकूण प्रवेश फी २ हजार २०० रुपये जमा झाली. प्रवेश फीसह एकूण ४६ हजार ५६८ रुपये भरणा करण्यात आलेला आहे. यावेळी महापालिका मंडई विभागाचे राजेंद्र बाबरे, शहापुरे, पिंडगुळकर, आर.डी. कांबळे, खरटमल, खान, शिवशरण, तळभंडारे आर्दीसह कर्मचारी उपस्थित होते.


## मविआकडून कोरोनाच्या नावाखाली विकासकामे रेंगाळली

### चंद्रकांत पाटलांची महाविकास आघाडीवर टिका

✔ **सोलापूर** : कोरोनाच्या नावाखाली महाराष्ट्रातील सर्वच विकास कामे महाविकास आघाडीकडून रेंगाळली आहेत. कोरोनाच्या नावाखाली महाविकास आघाडीची अकार्यक्षमात व इच्छाशक्ती नसण्याची कारणे दिसून येतात, अशी टिका भाजपचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीवर केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कौशल्य विकास अभ्यासक्रमाच्या पहिला दीक्षांत समारंभासाठी ते सोमवारी, २९ ऑगस्ट रोजी ते सोलापूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीला लक्ष केले. पुढे ते म्हणाले, कोरोनाच्या नावाखाली महाराष्ट्रातील सर्वच गोष्टी रेंगाळल्या आहेत. ज्यामध्ये सोलापूर विद्यापीठातील अहिल्यादेवींच्या स्मारकासाठीचा निधी असेल. परंतु आज घोषणा करतो की, अहिल्यादेवींच्या पुतळ्याला व बसवेश्वरांच्या स्मारकाला निधी कमी पडू देणार नाही. अध्यासन केंद्रासाठीचे ४ कोटी निधींचा प्रस्ताव पुरवण्यांमध्ये पुढील महिन्यात घेऊन मार्गी लावतो.

आपले राज्य आर्थिक शिस्त पाळतं. परंतु गेल्या अडीच वर्षात ही आर्थिक शिस्तही अगोदरच्या सरकारकडून पाळली गेली नाही. हजार कोटींच्या फाईली मंजूर केल्या. परंतु त्यावर फायनान्स डिपार्टमेंटच्या सह्या नाहीत. त्यामुळे त्या फाईली सध्या रद्द केल्या जात आहेत. कोरोना काळातही आपल्या राज्याचे जीएसटीचे कलेक्शन दर महिन्याला १ लाख ५० हजार कोटी हून अधिक आहे. यातील ५० टक्के केंद्राला आणि ५० टक्के राज्याला रात्री १२ वाजता सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जाते. परंतु काहींची गोम असते की आपले जीएसटीचे केंद्राकडून येणं राहिलं. करायचंच काही नसते म्हणून केंद्रावर खापर फोडाचे, असा टोला चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांचे नाव न घेता लगावला.



## सेल्फी घेताना शॉक बसलेल्या तरुणाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर



रेल्वे स्थानक परिसरात थांबलेल्या मालगाडीवर चढून सेल्फी घेत असताना विद्युत तारेचा शॉक बसल्याने जखमी झालेला मुकसित मुजाहीद जमादार (वय १६ रा.सिध्देश्वर पेठ सोलापूर) हा शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी पहाटेच्या सुमारास मरण पावला.

रविवारी दुपारच्या सुमारास तो रेल्वे स्थानकातील बाळे साईडच्या कॅबिन जवळ थांबलेल्या एका मालगाडीवर चढून मोबाईलने सेल्फी घेत होता. त्यावेळी विद्युत तारेच्या स्पर्श झाल्याने तो खाली कोसळून भाजला होता.त्याला गंभीर अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो पहाटे मरण पावला मयत जमादार याच्या पश्चात आई वडील, दोन भाऊ, आणि दोन बहिणी असा परिवार आहे. तो अकरावी इयत्तेत प्रवेश घेतला होता. या घटनेची नोंद रेल्वे पोलिसात झाली.सहाय्यक फौजदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## पुढच्या रविवारीही भारत-पाकिस्तान सामना

✔ **दुबई** : आशिया चषकातील दुसऱ्या रोमहर्षक सामन्यात भारतानं पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आलेल्या पाकिस्तानचा संघ १४% धावांवर ढेपाळला. प्रत्युत्तरात भारतानं पाच विकेट्स राखून पाकिस्तानानं दिलेलं लक्ष्य पूर्ण केलं. भारत आणि पाकिस्तान सामना क्रिकेट चाहत्यांसाठी पूर्णपणे मनोरंजक ठरला. आता लवकरच हे दोन्ही संघ पुन्हा एकदा आमने सामने येण्याची शक्यता आहे. भारतानं पाकिस्तानविरुद्ध पहिला सामना जिंकला आहे. पाकिस्तानसाठी हाँगकाँगला हरवणं मोठी गोष्ट नाही. म्हणजेच 'अ' गटात भारत पहिल्या आणि पाकिस्तान दुसऱ्या क्रमांकावर राहून पुढील फेरीत प्रवेश करेल.

## डोक्यात रॉड घातल्याने तरुण गंभीर; तिघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : पंढरपूर येथील जुना कराड नाका येथे गणपती बसविण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणाचा राग धरून लाथा बुक्क्या आणि डोक्यात रॉडने हल्ला केल्याने सुरज दत्तात्रय पवार (वय २१) हा तरुण गंभीर जखमी झाला.

ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. जखमीच्या फिर्यादीवरून पंढरपूर शहरच्या पोलिसांनी संग्राम नागनाथ शिंदे, अमोल शिंदे आणि शंकर पवार (सर्व रा. पंढरपूर )या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. सुरज पवार हा घरासमोर आपल्या दुचाकी वर बसला होता. त्यावेळी संग्राम शिंदे याने दोन दिवसापूर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरून चापटाने मारहाण केली. तर दोघांनी त्याला पकडून ठेवले तर एकाने त्याच्या पोटात बुक्क्या मारून डोक्यात रॉडने हल्ला केला. अशी नोंद पंढरपूर शहर पोलिसात झाली. फौजदार वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नाही हो, आम्ही रेशनचे धान्य नाही घेत!!

| कल्याण |
| --- |
| --- |

| मेन बाजार |
| --- |
| --- |

## ....तरच शरद पवार यांच्या कुटुंबाचा खरा चेहरा जनतेसमोर येईल : आ.पडळकर



✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कुटुंबीयांच्या रेशनकार्डवरील सर्व व्यक्तींची एकदा चौकशी करा, तरच त्यांचा खरा चेहरा जनतेसमोर येईल, अशी टीका भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. गोपीचंद पडळकर यांनी दै.सुराज्य शी संवाद साधला यावेळी त्यांनी शरद पवार यांच्या संपूर्ण कुटुंबाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली.

संपूर्ण पवार कुटुंबाच्या रेशनकार्डवरील व्यक्तींची चौकशी झाली पाहिजे. रेशनकार्डवर जेवढी नावे आहेत त्यांची डिटेलमध्ये चौकशी करावी. संपूर्ण चौकशीनंतरच पवार कुटुंबाचा खरा चेहरा जनतेसमोर येईल. शरद पवार हे संविधानापेक्षा मोठे नसून आयकर विभाग, ईडी अशा एजन्सींनी देखील सखोल चौकशी करणे गरजेचे असल्याची मागणी पडळकर यांनी केली आहे. गोपीचंद पडळकर यांनी यावेळी शिवसेनेवर देखील जोरदार टीका केली. ज्यांना लोकांमध्ये काहीही किंमत नाही, जनाधार नाही, अशा लोकांसोबत ते युती करत असून यावरून शिवसेना किती खोलात गेली आहे हे समोर आले आहे. पण अशा कोणत्याही टेकूने आता शिवसेना वर येणार नसल्याचे सांगत संभाजी ब्रिगेड सोबत युती केल्याने पडळकर यांनी शिवसेनेवर टीका केली. पडळकर म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांच्या विचारधारेपासून खूप मोठी फारकत घेतली आहे. आता त्यांना परत ट्रॅकवर येणे खूप अवघड आहे. ज्या लोकांनी हिंदुत्वाला विरोध केला, ज्या लोकांनी समाजात जातीयवाद पसरविण्याचा प्रयत्न केला अशा लोकांसोबत जाऊन उद्धव ठाकरे समाजाला काय मेसेज देणार?



राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांच्या ग्रीन एकर कंपनीची ईडीकडून चौकशी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर गोपिचंद पडळकर यांनी संपूर्ण पवार कुटुंबाची चौकशी करण्यात यावी असे म्हटले आहे. रेशनकार्डवर जेवढी नावे आहेत त्यांची डिटेलमध्ये चौकशी करावी. संपूर्ण चौकशीनंतरच पवार कुटुंबाचा खरा चेहरा जनतेसमोर येईल, असे पडळकर यांनी म्हटले आहे.